महाराष्ट्र लोकसेवा आयोग
Maharashtra Public Service Commission
मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५
ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in

क्रमांक:एमआयएस-०६१८/सीआर-२६/२०१८/तीन

# घोषणा

**विषय:-** राज्य सेवा मुख्य परीक्षा - २०१९ – लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी देण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांसोबत परीक्षेच्या वेळी उपस्थित राहणा-या लेखनिकांबाबत...

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १३, १४ व १५ जुलै, २०१९ रोजी आयोजित राज्य सेवा मुख्य परीक्षा २०१९ करीता लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी देण्यात आलेल्या दिव्यांग उमेदवारांसोबत लेखनिक म्हणून परीक्षेस उपस्थित राहणा-या व्यक्तींची आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक उपस्थिती प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**२.** प्रस्तुत निर्णयाच्या अनुषंगाने आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता लेखनिकाची मदत घेण्याच्या परवानगीसाठी विहित नमुन्यामध्ये (प्रपत्र-१) आयोगास विनंती अर्ज सादर करताना संबंधित उमेदवाराने लेखनिकाबाबतची संपूर्ण माहिती भरुन त्याचा अचूक आधार क्रमांक नमूद करणे तसेच विनंती अर्जासोबत लेखनिकाच्या आधार कार्डची छायांकित प्रत सादर करणे अनिवार्य आहे. तसेच, आयोगास विनंती अर्ज सादर केल्यानंतर लेखनिक बदलण्याची आवश्यकता भासल्यास त्याप्रमाणे लेखनिकाबाबतची सुधारित माहिती आयोगास desk३.mpsc@maharashtra.gov.in या ईमेल आडीवर परीक्षेपूर्वीच सादर करणे अनिवार्य आहे.

**३.** परीक्षेस उपस्थित राहताना दिव्यांग उमेदवाराने आयोगाच्या सूचनांप्रमाणे इतर मूळ कागदपत्रांसह लेखनिकाचे मूळ आधार कार्ड व त्याची छायांकित प्रत प्रत्येक पेपरकरीता सोबत आणणे अनिवार्य आहे.

**४.** परीक्षेच्या वेळी आधार क्रमांकाच्या आधारे बायोमेट्रिक पडताळणी करण्याकरीता संबंधित लेखनिकांची आधार संलग्नित बायोमेट्रिक माहिती अनलॉक(Unlock) असणे आवश्यक आहे. यास्तव, आधार प्रमाणीकरणाकरीता बायोमेट्रिक माहिती लॉक (Lock) केली असणा-या लेखनिकांनी परीक्षेस उपस्थित राहण्यापूर्वी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण (UIDAI) च्या संकेतस्थळावरुन बायोमेट्रिक माहिती अनलॉक(Unlock) करुन प्रमाणीकरणाकरीता खुली करावी. अन्यथा परीक्षेकरीता संबंधित लेखनिकास प्रवेश नाकारला जाऊ शकतो.

**५.** परीक्षेच्या वेळी संबंधित उमेदवार त्याच्या दिव्यांगत्वामुळे स्वत: पेपर लिहिण्यास सक्षम नसल्याच्या कारणास्तव त्यांना लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी देण्यात येते. लेखनिकाची मदत घेण्याची परवानगी दिलेल्या उमेदवारांच्या बाबतीत संबंधित लेखनिकांनी उमेदवाराने सांगितलेले उत्तरच उत्तरपुस्तिका/उत्तरपत्रिकेमध्ये लिहिणे/छायांकित करणे अपेक्षित आहे. संबंधित उमेदवाराने सांगितलेल्या उत्तराऐवजी लेखनिक स्वत: हून उत्तरे लिहित असल्याचे/छायांकित करीत असल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास तसेच आयोगाच्या सूचनांचे उमेदवाराकडून अथवा लेखनिकाकडून पालन न झाल्यास त्यांना आयोगामार्फत आयोजित परीक्षांकरीता प्रतिरोधित करण्यासह त्यांच्याविरुध्द प्रचलित नियम/कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल.

ठिकाण: मुंबई
दिनांक: ११ जुलै, २०१९

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग

TRIAL MODE - a valid license will remove this message. See the keywords property of this PDF for more information.